QP Code : **BH-3399**

(३ तास) [**एकूण गुण : १००**

**सूचना :** (१) कोणतेही **पाच** प्रश्न सोडवा.
(२) **सर्व** प्रश्नांना **समान** गुण आहेत.
(३) प्रत्येक विभागातील किमान **दोन** प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहे.
(४) **दोन्ही** विभागाची उत्तरे **एकाच** उत्तरपत्रिकेत लिहा.

## विभाग १

१. ऐतिहासिक भाषाविज्ञानाचे स्वरूप स्पष्ट करून तिच्या मर्यादा सविस्तर लिहा.

२. स्वनपरिवर्तन म्हणजे काय ? ते सांगून त्यामागील कारणे साधार स्पष्ट करा.

३. अर्थपरिवर्तनाचे स्वरूप सांगून त्याची कारणे व प्रकार सोदाहरण लिहा.

४. मराठी भाषेच्या उत्पत्तीसंबंधीच्या विविध मतमतांतरांचा ऊहापोह करा.

५. पुढील कोणत्याहि **दोहोंवर** विवेचक टिपणे लिहा.
(अ) भाषाकुल सिद्धांत
(ब) अंतर-बहिर् वर्तुळ सिद्धांत
(क) भाषिक आदानाचे प्रकार
(ड) पिजिन व क्रिऑल भाषा
(इ) मध्यकालीन मराठी भाषेचे ठळक विशेष.

## विभाग २

६. सोस्यूर, ब्लूमफिल्ड व चॉम्स्की यांच्या भाषाविषयक सिद्धांतांचा परिचय करून द्या.

७. स्वन, स्वनिम व स्वनांतरे या संकल्पना स्पष्ट करा.

८. रूपिम प्रक्रिया साधार स्पष्ट करा.

९. प्रमाण मराठी बोलीच्या तुलनेत वऱ्हाडी बोलीचे भाषिक विशेष सांगा.

१०. कोणत्याही **दोहों**वर विवेचक टिपणे लिहा :-
(अ) शून्य रूपिकान्तर
(ब) खंडित व खडाधिष्ठित स्वनिम
(क) उच्चार व लेखन यांतील अंतर
(ड) प्रथमोपस्थित संघटक पद्धती
(इ) प्रमाणभाषा व बोली यांतील संबंध

------------